**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. १०३/२०१४ मधील निशाणी क्र. ५ खालील आदेश</u>**

**श्री. दादासो निवृत्ती जाधव (वीर)–१**
**वि.**
**श्री. सुहास विलास बाईग–५**

(दिनांक **१७ ऑक्टोबर, २०१४** रोजी पारीत केला)

प्रस्तूत अर्जाद्वारे प्रतिवादींनी दावा मिळकतीतील वादींचे कब्जे वहिवाटीस हरकत करू नये अगर दावा मिळकती तबदील करू नये म्हणून तुर्तातूर्त ताकीदीची मागणी केलेली आहे.

२) वादींचे प्रकरण थोडक्यात असे आहे की, दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या दावा मिळकती वादी यांचे वडीलार्जित मालकी वहिवाटीच्या असून ते मयत खाशीबाई हिचे पुतणे आहेत. वादींनी खाशीबाईचा सांभाळ अतिशय उत्तम रितीने केलेला होता. वादी क्र. २ हे सन २००६ चे सुमारास वादी क्र. १ कडे नाशिक येथे गेले असता प्रतिवादींनी खाशीबाई हिला संजय गांधी निराधार योजनेसाठी प्रतिज्ञापत्र करावयाचे आहे असे सांगून कराड येथिल कचेरीत नेले व तिला फसवून मृत्युपत्रावर अंगठा घेतला व तथाकथीत दस्त ऐवज तयार केला. त्या नंतर खाशीबाई दिनांक ०६.११.२००८ रोजी मयत झाली. त्या नंतर नेहमी प्रमाणे वादीं दावा जमीनीत मेहनत मशागत करण्यास गेले असता प्रतिवादींनी त्यास हरकत घेतली व मृत्युपत्राने जमीनी मिळाल्याचे सांगितले. म्हणून वादींनी चौकशी केली असता तथाकथीत मृत्युपत्र झाल्याचे दिनांक २०.११.२०१३ रोजी कळाले. प्रतिवादींनी दावा मिळकतीतील वादींचे वहिवाटीस मृत्युपत्रा आधारे हरकत केली म्हणून प्रस्तूत अर्ज केलेला आहे.

३) प्रतिवादींतर्फे निशाणी क्र. २७ अन्वये म्हणणे देवून दाव्यातील कथने नाकारलेली आहेत. त्यांचे म्हणणे थोडक्यात असे आहे की, दावेतील वंशावळ चुकीची व काल्पनीक असून मयत खाशीबाई बरोबर वादींचा कोणताही संबंध नाही. प्रतिवादी क्र. १ ते ५ हे खाशीबाईचे बहीणीचे नातू असून

प्रतिवादी क्र. ६ ही बहीणीची मुलगी आहे. प्रतिवादीं खाशीबाईची देखभाल करत होते. दावा मिळकतीत १९५० सालापासून प्रतिवादीं व त्यांचे कुटूंबीयांचा कब्जा होता व आहे. खाशीबाई यांनी दिनांक २०.०३.२००६ रोजी उंब्रज येथिल कचेरीत नोंदणीकृत मृत्युपत्र करून ठेवले होते व त्यानुसार दावा मिळकतींचे अभिलेखासदरी प्रतिवादींची नोंद झालेली आहे. दावा मिळकतीत प्रतिवादींचा कब्जा असून वादींचा दावा मिळकतीशी काहीही संबंध नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४) निर्णयासाठी माझे समोर उपस्थित झालेले मुद्दे त्यावरील निष्कर्षासह मी खाली नमूद केलेले आहेत :—

| **अनु. क्रं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादींना सकृत दर्शनी केस आहे काय? | नाही |
| २. | सोयीचा समतोल वादींचे बाजूने आहे काय? | नाही |
| ३. | तुर्तातूर्त मनाईचा आदेश न दिल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होईल काय? | नाही |
| ४ | कोणता आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे अर्ज नामंजूर. |

५) प्रतिवादींतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी निशाणी क्र. ३० अन्वये लेखी युक्तीवादही दाखल केलेला आहे. वादींतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

## का र ण मी मां सा

### मुद्दे क्र. १ ते ३ :—

६) वादींतर्फे वकीलांनी मृत्युपत्रावरील खाशीबाईचे कथीत निशाणी अंगठयात तफावत असून व मृत्युपत्र संशयास्पद आहे असा मुद्दा मांडला. तथापी वादींचे दाव्यातील कथनाप्रमाणे प्रतिवादींनी मयत खाशीबाईचा

फसवून मृत्युपत्रावर निशाणी अंगठा घेतला. त्यामुळे वादींनी अप्रत्यक्षरित्या सकृत दर्शनी मृत्युपत्रावरील खाशीबाईचा निशाणी अंगठा कबूल केलेला आहे. त्यामुळे मृत्युपत्रावरील निशाणी अंगठयामधील तफावतीचा फायदा या क्षणी वादींना घेता येणार नाही असा माझा निष्कर्ष आहे. मृत्युपत्रासोबत वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये जरी तारीख नमूद नसली तरी ती बाबही अंतिम पुराव्यावरून स्पष्ट होणार आहे. त्यामुळे सदरचे बाबींचा फायदा या क्षणी वादींना घेता येणार नाही. महत्वाची बाब अशी आहे की प्रतिवादींनी मयत खाशाबाई हिला कराड येथे फसवून आणले व मृत्युपत्राचा तथाकथीत दस्त बनविला असे वादींचे कथन आहे. तथापी प्रकरणातील मृत्युपत्र हे उंब्रज येथिल कचेरीत नोंदविल्याचे सकृत दर्शनी स्पष्ट होते. अशा परिस्थीतीत वादींचे कथनांत सकृत दर्शनी तथ्य आढळत नाही.

७) प्रतिवादींनी वादी व खाशीबाई यांचेतील नातेसंबंध नाकारलेले आहेत. अशा परिस्थीतीत सदर नातेसंबंधाबाबत वादींनी सकृत दर्शनी पुरावा देणे आवश्यक होते. दाव्यातील वंशावळ देखील संदिग्ध आहे. त्यामुळे मृत्युपत्राला आव्हान देणेचा सकृत दर्शनी वादींना अधिकार असल्याचे स्पष्ट होत नाही. शिवाय वादींचे म्हणणेप्रमाणे दावा मिळकतीत त्यांचा कब्जा आहे तथापी या बाबीं सकृत दर्शनी कोणताही पुरावा वादींनी सादर केलेला नाही. या उलट प्रकाणातील कर भरल्याच्या पावत्या व सोसायटीच्या पावत्या प्रतिवादींनी हजर केलेल्या आहेत. सदरच्या बाबीं सकृत दर्शनी वादींचे विरोधात जातात. महत्वाची बाब अशी आहे की प्रकरणातील दावा मिळकतींचे उताऱ्यांवरून दावा मिळकतींचे अभिलेखावर प्रतिवादींची नोंद झाल्याचे दिसून येते. सदरचे नोंदीविरूध्द वादींनी आव्हान दिलेबाबत वादींनी सकृत दर्शनी पुरावा सादर केलेला नाही. अशा परिस्थीतीत वादींनी सकृत दर्शनी प्रकरण शाबीत केलेले नाही. तुर्तातूर्त ताकीद न दिलेस वादींचे कोणतेही अपरिमीत नुकसान होणार नाही. सोयीचा समतोल वादींचे बाजूने नाही. म्हणून मी मुद्दे क्र. १ ते ३

चे उत्तर नकारार्थी दिलेले आहे.

**मुद्‌दा क्र. ४ :—**

८) वरील सर्व निष्कर्षांचा एकत्रीत परिणाम म्हणजे वादींचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. प्रकरणातील विशिष्ठ परिस्थीती पाहता उभयपक्षकारांनी आपापला खर्च सोसणे योग्य होईल. म्हणून मुद्दा क्र. ४ चे उत्तरांती मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१) अर्ज निशाणी क्र. ५ नामंजूर करणेत येत आहे.

२) उभयपक्षकारांनी आपापला खर्च सोसण्याचा आहे.

ठिकाण : कराड
दिनांक :१७.१०.२०१४

(उ. प्र. कुलकर्णी)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
कराड

(श.मो.बोंदार्डे)
लघुलेखक